Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ June 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

Multidisciplinary International E-research Journal

**PEER REFREED AND INDEXED JOURNAL**

Two Day Interdisciplinary National Conference On

# INDIA @75

... Guest Editor ...

**Dr. O. J. Rasal**

**Mr. S. S. Patel**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Mr. H. S. Shaikh**

**Mr. C. M. Gangawane**

... Jointly Organized by ...

*Pravara Medical Trust's,*

**Arts, Commerce & Science College, Shevgaon**

**Dist. Ahmednagar – 414502**

*Printed by :* Academic Book Publications, Jalgaon

Impact Factor – 6.625 ▪ Special Issue - 000 ▪ March 2023 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal
Multidisciplinary International E-Research Journal

Printed by

**Academic Book Publications**

Dyandeep Apartment, Plot No. 2, Chaitanya Nagar,
Opp. Progressive English Medium School, Jalgaon - 425 001.
E-mail : academicbooksjalgaon@gmail.com
Ph.: (0257) 2235520, 2232800. Mob.: 91752 85943, 88308 24241.

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

60. **विसाव्या शतकातील स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाहाची जडणघडण** ........ 215
डॉ. सखाराम मारुती वांढरे

61. **साहित्य और सिनेमा: बदलते परिदृश्य** ........ 217
प्रा.डॉ. पांडुरंग अशोक दुकळे

62. **महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा समन्वयवादी वैचारीक अनुबंध: महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे** ........ 220
प्रा.अजित लक्ष्मण भालसिंग

63. **सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे हिंदू धर्म विषयक विचार** ........ 223
श्री सोपान लक्ष्मण नवथर

64. **मानसिक स्वास्थ्य एक दृष्टिक्षेप** ........ 225
सौ. निशा बाळासाहेब खरात, डॉ. सोनुने सुभाष श्रावण

65. **सहकारी बँक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा** ........ 229
डॉ. विजय आबासाहेब खर्डे, सुमित रमेश पुलाटे

66. **मिर्च मसाला चित्रपटातून अभिव्यक्त होणारे स्त्रीशक्तीकरण** ........ 232
डॉ.मकसन अंबाडे, प्रा. शांता रंगनाथ गडगे

67. **हिन्दी साहित्य का इतिहास** ........ 234
आरती भाऊराव पवार

68. **महानगरीय कथा : संकल्पना व स्वरूप** ........ 236
श्री. भागवत बाबासाहेब देशमुख

69. **कवी मारुती कसाब यांच्या ''पोरगं शेकत बसलंय'' कवितासंग्रहातून व्यक्त होणारी सामाजिकता** ........ 242
डॉ.बालाजी विठ्ठलराव डिगोळे

70. **ललितगद्याचे संकल्पनात्मक स्वरूप** ........ 248
डॉ. निलेश खरात

71. **आनंद पटवर्धन यांच्या 'जयभीम कॉम्रेड' या वास्तवपटातील जात-वर्ग संघर्षाचे चित्रण** ........ 250
डॉ. बापू चंदनशिवे

72. **हिंदी सिनेमा और भारतीयता** ........ 254
प्रा. डॉ. एस. बी. कोलते

73. **आत्मनिर्भर भारत** ........ 257
प्रा. संपतराव माणिकराव गर्जे

# सहकारी बँक व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा

**डॉ. विजय आबासाहेब खर्डे**
सहायक प्राध्यापक (मार्गदर्शक), वाणिज्य विभाग, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर.
**सुमित रमेश पुलाटे**
संशोधक विद्यार्थी, वाणिज्य विभाग, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर.

**गोषवारा:** *विसाव्या शतकाच्या पूर्वर्धात शेती तसेच ग्रामीण अर्थसहाय्याचे महत्त्व ओळखून या घटकांना अर्थसाह्य करण्यासाठी बँकांची स्थापना व्हावी असा विचार सुरू झाला. शेतीला नियमित व अल्प व्याजदरावर अर्थसहाय्याची आवश्यकता ओळखून सहकारी बँक व्यवसायाची स्थापना करण्याचा निर्णय होऊन सहकारी बँक व्यवसाय नियंत्रित करण्यासाठी सहकारी संस्था कायदा १९१२ स्थापन करण्यात आला व त्यानंतर अनेक सहकारी संस्था सुरू झाल्या. पुढे अनेक राज्यांनी त्यांचे स्वतंत्र सहकारी कायदे लागू केले. महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० साली अस्तित्वात आला. भारतातील ग्रामीण भागाचा आर्थिक विकासाचा स्तर वाढविणे या शुद्ध हेतूने सहकारी बँकांची स्थापना सहकारी कायद्याअंतर्गत करण्यात आली.*

**बीज संज्ञा:** *बँक, ग्रामीण अर्थव्यवस्था, ग्रामीण उद्योग, ग्रामीण विकास.*

**प्रस्तावना:**

भारताच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात एकूणच अर्थव्यवस्थेत बदलांची नांदी सुरू झाली त्यातच बँक व्यवसायासारख्या महत्त्वाच्या घटकातही अमूलाग्र बदल पाहावयास मिळाले.

सहकारी संस्थांना अधिनियमित करण्यासाठी भारतातील अनेक राज्यांनी स्वतंत्र कायदे लागू केले. महाराष्ट्रात सहकारी संस्था कायदा १९६० साली लागू करण्यात आला व या कायद्यांतर्गत सहकारी बँकांना योग्य अशी दिशा व वळण दिल्यामुळे शेतीला कर्ज पुरवठा करण्याचे काम सहकारी बँकांकडे सोपविण्यात आले. या कायद्यांतर्गत अनेक पतपुरवठा करणाऱ्या संस्था ग्रामीण भागात स्थापन होऊ लागल्या अशा संस्थांचे प्रमाण वाढावे म्हणून या संस्थांना सरकारने अनेक सवलती दिल्या. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सहकारी संस्थांची स्थापना होऊ लागली परंतु त्याची योग्य नियोजन व नियंत्रण नव्हते. या संस्थांवर नियंत्रण ठेवण्याकरिता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात आली. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभारावर नियंत्रण करण्यासाठी प्रत्येक राज्यात एक याप्रमाणे राज्य सहकारी बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला राज्य सहकारी बँकांवर नियमन व नियोजन करण्याकरिता तसेच त्यांच्या व नियंत्रण ठेवण्याकरिता १९६३ मध्ये कृषी पुनर्वित्त निगमाची स्थापना करण्यात आली. १९७५ मध्ये या निगमाचे नाव बदलून ते कृषी पुनर्वित्त व विकास निगम (ए आर डी सी) असे करण्यात आले परंतु या निगमाची अपयश पाहून देशातील तसेच ग्रामीण उद्योग व कृषी क्षेत्र यांची गरज लक्षात घेऊन तुमच्या विकासासाठी पुरेसा कर्ज पुरवठा करू शकेल अशा शिखर स्तरावर स्वातंत्र्य बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार १२ जुलै १९८२ रोजी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) या बँकेची स्थापना करण्यात आली व त्यानुसार सहकारी बँका ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करू लागल्या.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) सहकारी बँक रचना समजावून घेणे.

२) ग्रामीण व ग्रामीण उद्योगांना होणाऱ्या पतपुरवठ्याची माहिती घेणे.

३) सहकारी बँकांमुळे ग्रामीण भागाचे झालेले आर्थिक सक्षमीकरण अभ्यासणे.

**संशोधनाची साधने:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी संशोधकांनी विविध संदर्भ ग्रंथ विषयासंदर्भातील लेख इंटरनेट व इतर दुय्यम साधनांचा उपयोग सदर संशोधन लेखासाठी केला आहे.

**महत्त्वाच्या संकल्पना:**

» **सहकार:** प्रत्येकाने स्वत:पुरते व स्वतंत्रपणे कार्य न करता अनेकांनी एकत्र येऊन व परस्पर सहाय्याने कार्य करणे याला सहकार असे म्हणतात.

» **सहकारी बँक:** सहकारी बँक एक पारंपारिक संस्था आहे जी कार्यशील वर्गाकडूननिर्मित तसेच नियंत्रण केली जाते तसेच त्यात बचतींना प्रोत्साहन देऊन व्याजदर व परतफेड याबाबतीत सोयीस्कर अटींवर लहान कर्जे दिली जातात. – डिव्हाईन.

» सहकारी बँक म्हणजे अशी संस्था ज्या ठिकाणी गरिबांसाठी त्यांना मान्य असलेल्या तारणाच्या अटींवर बँकिंग व्यवहार केले जातात. – हेनरी वूल्फ

**भारतातील ग्रामीण पतपुरवठ्याचे मार्ग:**

१) बिगर संस्थात्मक मार्ग २) संस्थात्मक मार्ग

**१) बिगर संस्थात्मक मार्ग:**

भारतातील ग्रामीण पतपुरवठामध्ये बिगर संस्थात्मक हा एक महत्त्वपूर्ण घटक असून जवळजवळ भारतातील ४०% पतपुरवठा हा बिगर संस्थात्मक आहे. बिगर संस्थात्मक कर्जाचा व्याजदर मोठ्या प्रमाणावर असतो यामध्ये जमीन व इतर संपत्ती गहाण म्हणून ठेवली जाते बिगर संस्थात्मक मार्ग पुढीलप्रमाणे –

**१) सावकार:** ग्रामीण भागात सावकारी हा सर्वसामान्य व्यवसाय पूर्वीपासूनच चालत आलेला आहे आजही

काही प्रमाणात तो सुरू आहे. ओंकार मोठ्या व्याजदराने कर्ज देतात व शेतकऱ्यांची संपत्ती तसेच जमीन गहाण म्हणून स्वीकारतात.

२) **इतर वैयक्तिक मार्ग:** व्यापारी जमीनदार नातेवाईक अशा विविध घटकांकडून ग्रामीण भागामध्ये कर्ज व्यवहार होत असतात.

**२) संस्थात्मक मार्ग:**

कृषी पतपुरवठा करण्यासाठी संस्थात्मक मार्ग हे सर्वमान्य व प्रगतिशील धोरण आहे. वेळेत व मुबलक प्रमाणात पतपुरवठा करणे, शेतीतील उत्पादक व उत्पादन क्षमता वाढविणे ही प्रमुख धोरण संस्थात्मक मार्गांचे असते. असतात्मक मार्गाने लहान व किरकोळ शेतकऱ्यांना आणि इतर दुर्बल घटकांना पतपुरवठा उपलब्ध होतो, तसेच आधुनिक तंत्रज्ञान व आधुनिक शेती पद्धतीचा विकास होतो. कृषी पतपुरवठा तसेच ग्रामीण उद्योगांना पतपुरवठा करणाऱ्या काही संस्था पुढीलप्रमाणे –

**राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड):**

कृषी व ग्रामीण विकासाला वित्त पुरवठा करणारी नाबार्ड ही सर्वोच्च वित्त संस्था आहे. नाबार्डची स्थापना १२ जुलै १९८२ रोजी झाली. भारत सरकार व भारतीय मध्यवर्ती बँक यांच्या संयुक्त भाग भांडवलातून नाबार्डची स्थापना करण्यात आली. ही एक सर्वोच्च संस्था असून शेती लघुउद्योग कुटीर व ग्रामीण उद्योग हस्तव्यवसाय इत्यादींच्या विकासाला प्रोत्साहन देते.

१) **ग्रामीण सहकारी पतपुरवठा संस्था:** ग्रामीण पतपुरवठा हा अल्पकालीन सहकारी पतसंस्था व दीर्घकालीन सहकारी पतसंस्था यामध्ये विभागलेला आहे.

२) **अल्पकालीन सहकारी पतसंस्था:** अल्पकालीन पतसंस्था या अल्पकाळासाठी कर्ज पुरवठा करतात. त्यांची रचना पुढील प्रमाणे –

» प्राथमिक कृषी पतसंस्था
» जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका
» राज्य सहकारी बँक

**ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी बँकांची भूमिका:**

विकसनशील शेती अर्थव्यवस्थेचा भक्कम असा पाया समजला जातो. परंतु ग्रामीण भागातील लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असणारे शेतीला कर्जपुरवठ्याची मोठ्या प्रमाणावर गरज भासत असते इतर व्यवसायाप्रमाणे शेती हा ही एक व्यवसाय असून योग्य वेळी भांडवलाची उपलब्धता झाल्यामुळे शेती क्षेत्राचा परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास साधता येतो.

**कृषी व ग्रामीण वित्त पुरवठा:**

शेती तसेच शेतीपूरक व्यवसायांकरिता शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प तसेच दीर्घ मुदतीचा कर्ज पतपुरवठा इत्यादींच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य केले जाते. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक नाबार्ड ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक यांच्यामार्फत अल्प व मध्यम मदतीची कर्ज वितरित करते. महाराष्ट्र राज्यासाठी सन २०२२–२३ करिता प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्जाराखाडा रुपये ५.२२ लाख कोटी आहे व यामध्ये कृषी व सलग्न कार्यक्षेत्राचा हिस्सा २४.१% आहे. प्रादेशिक ग्रामीण बँका महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांनी दिलेल्या पतपुरवठा संदर्भात माहिती पुढील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र.१.१**

**प्रादेशिक ग्रामीण बँक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी दिलेली कर्ज (रक्कम कोटी मध्ये)**

| कर्जाचा प्रकार | प्रादेशिक ग्रामीण बँका | | महाराष्ट्र राज्य सहकारी व जिल्हा मध्यवर्ती बँक | | २०२१–२२ | २०२२–२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१–२२ | २०२२–२३ | २०२१–२२ | २०२२–२३ | २०२१–२२ | २०२२–२३ |
| पीक कर्ज | ३१८९ | ४००५ | १८३०८ | १८२४८ | २१४९७ | २२२५३ |
| कृषी मुदत कर्ज | ३२० | २२८ | १०४२ | ५५२ | १३६२ | ७८० |
| एकूण | ३५०९ | ४२३३ | १९३५० | १८८०० | २२८५९ | २३०३३ |
| | | | | | | |

**आधार :– राज्यस्तरीय बँकर्स समिती महाराष्ट्र राज्य.**
( माहिती सप्टेंबर २०२२ पर्यंत)

**कृषी व कृषी पूरक उद्योगांचे सक्षमीकरण:**

राज्यात निम्नस्तरावर कृषी वित्त पुरवठा करण्यासाठी थेट संबंधित असणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी सभासदांना अल्पमुदतीची पीक कर्ज उपलब्ध करून देतात. ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या सहकारी बँकांमुळे ग्रामीण भागात असणाऱ्या कृषी व कृषी पूरक उद्योगांची सक्षमीकरण होण्यास मदत झाली. ग्रामीण भागामध्ये कार्य करणाऱ्या सहकारी बँका पतसंस्था यांचा समावेश होतो. तसेच प्रत्येक गावात असलेल्या सेवा सोसायटीमुळे हे जाळे ग्रामीण भागात सर्व दूर पसरले. सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र एखादे गाव किंवा अगदीच लहान गाव असेल तर दोन–तीन गावे मिळून सहकारी बँकेचे कार्य चालते. ग्रामीण सहकारी बँकांमध्ये गाव पातळी असलेल्या प्राथमिक कृषी सहकारी संस्था किंवा सेवा सोसायटी त्याचबरोबर जिल्हा पातळीवर असलेले जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राज्य पातळीवर असलेल्या राज्य सहकारी बँका तर राष्ट्रीय पातळीवर असलेली नाबार्ड या अंतर्गत सहकारी बँकांचे कामकाज चालते. सहकारी बँकांच्या माध्यमातून कृषी व कृषी पूर्वक या ग्रामीण भागातील उद्योगांची सक्षमीकरण कसे होत आहे हे बघूया.

१) **बचतीला प्रोत्साहन मिळाले :** सहकारी बँकांच्या म ाध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या व्यवसायिकांच्या बचतीस प्रोत्साहित केले जाते सहकारी बँकांमार्फत बचत ठेव खाते आवर्ती ठेव योजना यासारख्या विविध योजना राबविण्यात आल्याने ग्रामीण भागातील बचतीस प्रोत्साहन मिळाले.

ISSN : 2348-7143
June 2023

२) **बचतीचा उत्पादक वापर होऊ लागला:** सहकारी बँक व्यवसायापूर्वी लोकांना बचतीची गुंतवणूक करण्यासाठी संधी उपलब्ध नव्हत्या. सहकारी बँक व्यवसाय ग्रामीण भागात सर्व दूर पसरल्यामुळे ग्रामीण भागात जमा झालेल्या बचतीची गुंतवणूक होऊ लागली. वया बचतीचे रूपांतरण सहकारी बँकांच्या माध्यमातून कर्जरूपाने ग्रामीण उद्योग कृषी कृषीपूरक जसे की पशुपालन कुटपालन यासारख्या उत्पादक कामांसाठी या बचतीचा वापर होऊ लागला.

३) **सावकारकीतून मुक्तता:** सहकारी बँक व्यवसाय पूर्वी ग्रामीण भागात खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले जात होते. सहकारी बँकांची निर्मिती झाल्यावर खाजगी सावकारकिला आळा बसला. व सहकारी बँकेमार्फत कर्जाची उपलब्धता होऊ लागली.

४) **अल्प व्याजदर:** ग्रामीण भागातील लोकांना शेती तसेच शेतीपूरक व्यवसाय करिता सहकारी बँकांमार्फत अल्प व्याजदरामध्ये कर्ज पुरवठा होणे शक्य झाले.

५) **पतपुरवठ्याची उपलब्धता:** सहकारी कृषी पतपुरवठा संस्था सहकारी बँक इत्यादीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कृषी व कृषी पूरक व्यवसाय विकासासाठी पतपुरवठा उपलब्ध होऊ लागला.

६) **आर्थिक व समाज उपयोगी कार्यात सहभाग:** सहकारी बँक तसेच गावोगावी स्थित असलेल्या सेवा सोसायटी यांच्यामार्फत शेतकऱ्यांना बी बियाणे, खते, शेती, अवजारे आणि यंत्रे कीटकनाशके इत्यादी उपलब्ध करून देणे. शेतमाल साठवण्यासाठी गोदामाची व्यवस्था करणे. अशा आर्थिक व समाज उपयोगी कार्यांची पूर्तता करण्याचे काम सहकारी बँकांच्या माध्यमातून होत आहे.

**निष्कर्ष:**

सदर शोधनिबंधात सहकारी बँक व्यवसायाचा ग्रामीण अर्थकारणातील प्रभावाचा अभ्यास करत असताना. गाव पातळीवरती तसेच राज्य पातळीवर सहकारी संस्थांना काही समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये अकार्यक्षम व्यवस्थापन, भांडवलाच्या मर्यादा तसेच थकबाकीची महत्त्वाची समस्या, त्याचबरोबर सहकारी बँकांवरती राजकीय पुढाऱ्यांचा प्रभाव असल्याने मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप वाढत आहे.

परंतु जर सहकारी बँकांना उद्भवणाऱ्या समस्या वरती मात करत ग्रामीण अर्थकारणात आपली भूमिका अधिक प्रभावी झाली बनवायची असेल तर प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची, थकबाकी वरती विशेष उपाययोजना, राजकीय हस्तक्षेप कमी करणे, तसेच भांडवलाचे प्रमाण वाढवून व्यवहारांचे आधुनिकीकरण केले तर सहकारी बँक ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे अधिक प्रभावीपणे कार्य पार पाडू शकते.

**संदर्भ:**

१. आधुनिक बँक व्यवसाय आणि वित्त प्रणाली, के बी दिवटे, प्रशांत प्रकाशन, जळगाव, ५ सप्टेंबर २०१४.
२. भारतीय बँकिंग व्यवस्था, शंकर तळेकर, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
३. बँकिंग तत्त्व आणि व्यवहार, एस. एम. कोलते, प्रशांत प्रकाशन जळगाव, जानेवारी २०१५.
४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३.